# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**उच्च व तंत्रशिक्षण विभाग** **जाहिरात क्रमांक : १३०/२०१५** **धारिका क्रमांक : १५(१)(६०)/११९३/सात**

आयोगामार्फत, **उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण-नि-उपशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक)** या पदावरील सरळसेवा भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली अर्हता, अटी व शर्तींची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- चालू रिक्त पद- अराखीव-१**

(१) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शुद्धिपत्रक क्रमांक अपंग-२०१३/प्र.क्र.३५/अ.क.२, दिनांक १५ जुलै, २०१३ नुसार सदर पदांकरीता दर्शविण्यात आलेले अपंगत्व असलेले उमेदवार संबंधीत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत:-
**(अ) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू** (Locomotor Disability or Cerebral Palsy), **(ब) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी** (Blindness/Low Vision)

(३) मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याची प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करून घ्यावीत.

**३. वेतनश्रेणी**- रु. १५,६००-३९,१०० + ग्रेड पे रु. ६,६००/-, **एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. ५०,०००/-.**

**४. पात्रता:-**

४.१ भारतीय नागरिक.

**४.२ वय:-** (१) **दिनांक १ डिसेंबर, २०१५** रोजी ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.
(२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा अट लागू नाही.
(३) शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.३ शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

(a) Possess a Master's degree in Engineering or Technology or a second class degree in Engineering or Technology; **OR**

(b) Possess a second class diploma in Engineering or Technology or an equivalent qualification and have passed **Sections 'A' and 'B'** of the Associate Membership Examination of the institute of Engineers (India); **AND**

**(c)** Possess, Professional experience in an Engineering or Technology concern preferably engaged in production or experience of teaching in an Engineering College or Polytechnic or Technological Institute or combined professional and teaching experience of the abovementioned type for not less than **five years**; gained after acquiring the qualifications mentioned in sub-clause (a) or (b) above; **OR**,

(d) (i) Possess a second class diploma in Engineering or Technology; and,
(ii) Possess, teaching or professional and teaching experience of the type mentioned in sub-clause (c) above, for not less than **ten years,** out of which at least **five years** should have been in the capacity of Principal, Industrial Training Institute or an equivalent or higher post, gained after acquiring the qualification mentioned in sub clause (i) above.

**Provided that :-**

1) In the case of candidate possessing Master's degree, the period spent in acquiring the degree, but not exceeding two years may be counted towards the period of experience prescribed above.

2) The age limit may be relaxed by Government on the recommendation of the Commission in favour of candidates having exceptional qualifications or experience or both.
**परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.**

3) If candidates with the prescribed period of experience are not available in sufficient numbers, those with experience of a shorter period **(to the extent 40%)** may also be considered.

4) Preference may be given to candidates having experience in administering the Apprenticeship Training Scheme or Craftsman Training Scheme.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क : अमागास - रु. ५१५/-**

मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदासाठीच्या अटी व शर्तींची पूर्तता (उदा. वयोमर्यादा, परीक्षा शुल्क,अनुभव व अर्हता इ.) केल्यासच अशा उमेदवारांची अराखीव पदासाठी शिफारस करण्यात येईल.

**९. अर्ज करण्याची पद्धत :-**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज** https://mahampsc.mahaonline.gov.in **या वेबसाईटद्वारे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ ते दिनांक १ सप्टेंबर, २०१५ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.**

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

९.६ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायंतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर **'Unpaid'** असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१३. आयोगाच्या कायार्लयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची ईलेक्ट्रॉनिक साधनेआणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**१४. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१५. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०१५ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई** **सु. स. केसरकर**

**दिनांक: १२ ऑगस्ट, २०१५** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**